# आहो मुख्यमंत्री साहेब, बीडमध्ये कायद्याचे राज्य आहे की नाही, वकिलाला मारहाण होत असेल तर सर्वसामान्यांचे काय?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २१० ■ शुक्रवार दि.१८ एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 210 ■ Friday Dt.18 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# अंबाजोगाई न्यायालयात वकिली करणाऱ्या महिलेला सरपंच आणि कार्यकर्त्यांकडून बेदम मारहाण!

## बीड जिल्ह्यातील स्थिती पाहता गृहमंत्री, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे?

- रक्त साकळेपर्यंत पाईपने अमानुष मारहाण; पाईपच्या माराने अंग काळनिळं पडलं
- सरपंच आणि इतर दहा जणांनी मिळून वकील महिलेला मारहाण करणं कितपत योग्य आहे?
- बीड जिल्ह्यात चाललंय काय, पोलीस प्रशासन करतय काय, कायद्याचा धाक कमी का होतोय?
- गुन्हेगारीचे प्रमाण कमी होण्याऐवजी वाढतच चालले; कायद्याला कोण कमजोर करत आहे?

- सध्याच्या परिस्थितीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न बनला गंभीर; पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह?
- पालकमंत्री अजितदादांकडून जनतेला आशा लागली होती की, बीडमध्ये काहीतरी बद्दल होईल, बदल होण्याऐवजी गुन्हेगारी क्षेत्रामध्ये वाढ?
- गुन्हेगारांवर कडक कारवाई होऊन देखील शिक्षा का होत नाही; नुसती कारवाईच नाही तर कडक शिक्षा व्हायला पाहिजे?
- गुन्हेगारी करणाऱ्यांना फासावर लटकवले पाहिजेत तरच बीड जिल्ह्यातील जनता मोकळा श्वास घेईल!
- गावात संबंधित सरपंचाचा कारभार कसा असेल, कोणत्या पक्षाचा हा सरपंच आहे?
- याप्रकरणी पोलीस प्रशासनाकडून नेमकी काय कारवाई केली जाते हे पाहणे महत्वाचे ठरणार?



बीड । प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांपासून बीड जिल्हा हा जिल्ह्यातील गुन्हेगारीच्या कृत्यामुळे सतत चर्चेत आहे. अशातच अंबाजोगाई तालुक्यातून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. दि.१४ एप्रिल रोजी वकील असलेल्या ज्ञानेश्वरी अंजान हिला मारहाण करण्यात आली होती. सरपंच आणि त्याच्या कार्यकर्त्यांनी पाईपने ज्ञानेश्वरीला प्रचंड मारले. ही मारहाण इतकी भीषण होती की, ज्ञानेश्वरी अंजान यांच्या अंगातील रक्त साकळले असून त्यांच्या पाठीवर काळे–निळे वळ उठले होते. ही घटना उघडकीस आल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. सदरील घटना ही महाराष्ट्राला शरमेन, मान खाली घालायला लावणारी तसेच काळीमा फासणारी घटना घडली आहे. अंबाजोगाई येथे सत्र न्यायालयात वकिली करणाऱ्या महिलेला गावातील सरपंच व त्याच्या कार्यकर्त्यांनी बेदम मारहाण केली आहे. या महिलेचा काय गुन्हा होता? बीड मधील वाढती गुन्हेगारी व सध्याची स्थिती पाहता गृहमंत्री, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी जनतेकडून होत आहे.

दिवसांदिवस गुन्हेगारी वाढत असताना पोलीस प्रशासन काय करतंय? नेमकं बीड जिल्ह्यात चाललंय तरी काय? कायद्याला कोण कमजोर करत आहे. गुन्हेगारीचे प्रमाण कमी होण्याऐवजी वाढत का चाललेले आहेत. असे अनेक प्रश्न बीड जिल्ह्यातील जनता विचारत आहे. या सर्व प्रकाराला सरकार जबाबदार आहे कारण बिहार पेक्षाही भयंकर परिस्थिती बीडची झाली आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. तरीही गुन्हेगारांवर कडक कारवाई होऊन शिक्षा होत नाही. नुसती कारवाईच नाही तर कडक शिक्षा व्हायला पाहिजे तसेच गुन्हेगार फासावर लटकवले पाहिजे तरच या राज्यातील व बीड जिल्ह्यातील जनता मोकळा श्वास घेईल. अशीच पुन्हा एक नवीन घटना समोर आली आहे. वकिली करणाऱ्या महिलेला सरपंच आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून शेतात रिंगण करून काट्या आणि जेसीबीच्या

पान २ वर



### शेतात रिंगण करून काठ्या आणि जे.सी.बी पाईपने जबर मारहाण

अंबाजोगाई सत्र न्यायालयात वकीली करणार्या महिलेला सरपंच आणि त्याच्या कार्यकर्त्याकडून शेतात रिंगण करून काठ्या आणि जे.सी.बी पाईपने जबर मारहाण केली आहे. यात महिला बेशुद्ध पडल्यानंतर दवाखान्यातुन ही एका रात्रीत उपचार करून घरी पाठवलं आहे. सरपंच आणि इतर दहा पुरूषांनी मिळुन एका वकील असलेल्या स्त्रीला मारहाण करणं कितपत योग्य आहे? गावात सरपंचाचा कारभार कसा असेल, कोणत्या पक्षाचा हा सरपंच आहे? असा संतप्त सवाल जितेंद्र आव्हाड यांनी एक्सवर पोस्ट करत विचारला आहे. त्यामुळे या प्रकरणी नेमकी काय कारवाई केली जाते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### जितेंद्र आव्हाड यांच्या पोस्टनंतर समोर आला मारहाणीचा प्रकार

पुढे आलेल्या माहिती नुसार, घटनेतील पडीत महिलेने ध्वनी प्रदूषणामुळे मायग्रेनचा त्रास होत असल्याने घरापुढील लाऊडस्पिकर, पिठाच्या गिरण्या काढाव्यात याबाबत कार्यालयीन तक्रारी दिल्या होत्या. यानंतर या वकील महिलेला अमानुष मारहाण करण्यात आली आहे. मारहाणीनंतर ही महिला बेशुद्ध देखील पडली होती. त्यानंतर तिला उपचारानंतर घरी पाठवल्याचे या पोस्ट मध्ये म्हटले आहे. या मारहाणीनंतरचे फोटो देखील आता समोर आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी एक्सवर पोस्ट करत ही माहिती दिल्यानंतर अंबाजोगाई तालुक्यातील हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

# श्रीक्षेत्र नारायणगड सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेवून चालणारा गड आहे : महंत शिवाजी महाराज

## वारकरी संप्रदायात जाती भेद नसून जातीपातीला गाडण्याची ताकद आहे - महंत शिवाजी महाराज

## नगद नारायणाच्या जयघोषाने अवघी दुमदुमली राक्षसभुवननगरी; नारळी सप्ताहाच्या सांगतेला लाखोंचा जनसागर उसळला



गेवराई । प्रतिनिधी

मराठवाडा ही साधू संताची भुमी आहे. देव जन्म देतो परंतू संत हे जीवनात सदमार्ग दाखवतात संत हेच जीवाचा उद्धार करतात. स्वानंद सुखनिवासी संत कुलभूषण महात्मा श्री नगदनारायण महाराजांची थोर महान परंपरा आहे. त्यांच्या तपश्चर्यामुळे पंढरपूरचे देव नारायणगडावर आले. तर जो भक्त नगदनारायण महाराजांची मनोभावे सेवा करतो त्याला नगद फळ मिळते. साधूंचे आशिर्वाद मिळवण्यासाठी घालून दिलेला मार्ग म्हणजे हरिनाम सप्ताह होय तर श्रीक्षेत्र नारायणगड सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेवून चालणारा गड असून वारकरी संप्रदायात जाती भेद नाही तर जातीपातीला गाडण्याची ताकद आहे. येथे सर्व जाती धर्मातील लोक मोठ्या भक्तीभावाने राहतात असे प्रतिपादन श्रीक्षेत्र नारायणगडाचे महंत गुरुवर्य प्रेममुर्ती श्री शिवाजी महाराज यांनी व्यक्त केले.

श्रीक्षेत्र नारायणगडाच्या ७३ व्या नारळी अखंड हरिनाम सप्ताहाचे दि.१० ते दि.१७ एप्रिल दरम्यान मौजे राक्षसभुवन तांबा ता. शिरूर (का.) जि. बीड येथे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहात गेले सात दिवस अध्यात्मिक , समाज प्रबोधन व हरिनामाचा गजर होवून जागर झाला तर या सप्ताहाची गुरुवार दि.१७ एप्रिल रोजी दुपारी ०१ ते ०३ वेळेत श्रीक्षेत्र नारायणगडाचे महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराज यांच्या अमृततुल्य काल्याचे कीर्तनाने उत्साहात सांगता झाली यावेळी ते बोलत होते. यावेळी कीर्तनप्रसंगी मराठा संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील, आ.सुरेश धस, माजी.आ.बाळासाहेब आजबे, ज्योतीताई मेटे, उत्तराधिकारी संभाजी महाराज, धनंजय देशमुख, महेबुब शेख, दिलीप गोरे, जे.पी.शेळके, बी.बी.जाधव, ड.महादेव तुपे, बळीराम गवते , सौरभ सोनवणे, किशोर पिंगळे , नितीन धांडे, राजेंद्र मस्के, गंगाधर काळकुटे , चंद्रकांत नवले, महेश दाभाडे, कुंडलिक खांडे यांच्यासह संत- महंत विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी तसेच जिल्हाभरातून महिला व पुरुष भाविकांचा लाखोंचा जनसागर उसळला होता. दरम्यान पुढच्या वर्षीच्या नारळी सप्ताहाचे गेवराई तालुक्यातील उमापुर येथील ग्रामस्थांनी नारळ घेतले आहे.

पुढे बोलताना महंत शिवाजी महाराज म्हणाले की, आपल्या मुलांवर चांगले संस्कार करा संपत्ती पेक्षा संतती जपा. दुःखाचा संसार सुखाचा करायचा असेल तर देवाचे नामस्मरण करुन राम कृष्ण हरी हा जप करा. आईची आणि गाईची सेवा करा असा मौलिक सल्ला देवून गोकुळातील भगवान श्रीकृष्णाचे अनेक उदाहरणे सांगितली. एकमेकांच्या मनात एकमेकांबद्दल प्रेमाचा पाझर फुटण्यासाठी होतो तो काला होय तसेच शेतकऱ्यांनो आत्महत्या करु नका.

सुख, शांती आणि समाधानासाठी देवाचे नामस्मरण करा तसेच भक्ती मंडपात या भक्तीत खूप मोठी ताकद आहे. एका खांद्यावर संसाराचा भार तर दुसऱ्या खांद्यावर परमार्थ यामधून नक्कीच सोन्याचे दिवस येतात आणि संसार सुखाचा होतो आणि नगदनारायण महाराजांची निस्वार्थ भावनेतून सेवा करा त्यांचे आशिर्वाद तुमच्या नेहमी पाठीशी राहतील असे शुभाशीर्वाद देवून या सप्ताहाची उत्साहात सांगता झाली. कीर्तनानंतर उपस्थित लाखों भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. दरम्यान नारळी सप्ताहाच्या सांगतेला लाखोंचा जनसागर उसळला होता तर नगदनारायण महाराजांच्या नामघोषाने अवघी राक्षसभुवननगरी दुमदुमून गेली होती. यावेळी नारायणगडाचे टाळकरी, वारकरी, मृदंगाचार्य, गायणाचार्य, भालदार, चोपदार, विणेकरी सह पंचक्रोशीतील भजनी मंडळ उपस्थित होते. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी समस्त ग्रामस्थ मंडळी, राक्षसभुवन (तांबा), विघनवाडी, खोलेवाडी, पिंपळेवाडी येथील ग्रामस्थांनी आठ दिवस परिश्रम घेतले. तर या कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन ज्ञानदेव काशिद यांनी केले.

**राक्षसभुवन (तांबा) ग्रामस्थांचे उत्कृष्ट नियोजन; शिवाजी महाराजांनी केले तोंडभरुन कौतुक**

शिरुर (का) तालुक्यातील राक्षसभूवन तांबा), विघनवाडी, खोलेवाडी, पिंपळेवाडी या गावातील तरुण, महिला मंडळ तसेच जेष्ठांसह इथल्या प्रत्येकाने तन- मन धनाने नारायणगडाच्या नारळी सप्ताहात काम केले विशेषतः तरुणांनी विविध कमिट्या गठीत करुन शिस्तबद्ध नियोजन केले. आपल्या सप्ताहाची सर्वत्र चर्चा असून महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार मंडळींनी उपस्थित राहून राक्षसभुवनकरांच्या नियोजनाचे कौतुक केले. सर्वांची एक भावना झाल्यावर खरं सुख असतं प्रत्येकाने सेवा केली. महिला मंडळ, तरुणांसह जेष्ठ मंडळींनी कमिटीच्या माध्यमातून खुप सुंदर सेवा केली. ह्या नारळी सप्ताहाचा महाराष्ट्रात सुंगध पोहचला आहे. नगदनारायण महाराजांचे आपल्या सर्वांना आर्शिवार्द आहेत असे सांगून महंत शिवाजी महाराज यांनी राक्षसभुवन व पंचक्रोशीतील ग्रामस्थांचे उत्कृष्ट नियोजनाबद्दल तोंडभरुन कौतुक केले.

पान १ वरून...

### अंबाजोगाई न्यायालयात वकिली करणाऱ्या महिलेला...

पाईपने जबर मारहाण केली आहे. यामुळे मोठी खळबळ माजली आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा दिला पाहिजे कारण परिस्थिती आता दिवसांदिवस बिघडत चाललेली आहे. आणि या सर्व परिस्थितीला या राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री आणि फडणवीस सरकार जबाबदार आहे. बीडचे पालकमंत्री अजित पवार हे आल्यानंतर बीडच्या जनतेला अशा लागली होती की बीडमध्ये काहीतरी बदल होईल. पण बदल होण्याऐवजी गुन्हेगारी क्षेत्रामध्ये वाढ होताना दिसत आहे त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला असून पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. पोलीस प्रशासन करता येते काय असे प्रश्न नागरीकांकडून विचारले जात आहे.

वकील असलेल्या ज्ञानेश्वरी अंजान यांनी बोलताना सांगितले की, एका मंदिराच्या भोंग्याचा आवाज तीव्र होता. मी त्यावेळी अभ्यास करत होते. जास्त आवाजामुळे माझं अभ्यासात लक्ष लागत नव्हते. मी त्यावेळी सरपंच यांना फोन करुन भोंग्याचा आवाज कमी करायला सांगितला. त्यांनी मी कर्मचाऱ्याला आवाज कमी करायला सांगतो, असे सांगितले. मात्र, दोन तास उलटूनही काही झाले नाही. मी पुन्हा फोन केला तेव्हा कर्मचारी माझा कॉल उचलत नसल्याचे सरपंचांनी सांगितले. त्यामुळे मी संबंधित कर्मचाऱ्याच्या घरी जाऊन देवळातील भोंग्याचा आवाज कमी करायला सांगितले तेव्हा मी नॉनव्हेज खाल्ल्याने मंदिरात जाऊ शकत नाही, असे त्याने म्हटले. त्यामुळे मी पुन्हा सरपंचांना कॉल केला तेव्हा त्यांनी पोलिसांत तक्रार करायला सांगितले. मी तरीही आधी ग्रामविकास अधिकाऱ्याला फोन केला. तो बोलला मी उद्या आल्यावर आवाज कमी करतो. त्यावर मी बोलले की, आवाज सकाळपर्यंत सुरु राहिला तर मी काय करु? मला त्रास होत असल्याने आवाज सहन होत नव्हता. त्यामुळे मी पोलीस ठाण्यात फोन करुन तक्रार केली.

पोलिसांनी त्यामध्ये हस्तक्षेप करुन आवाज कमी केला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सरपंच त्याच्या लोकांना घेऊन माझ्या घरी आला. माझ्या आई-वडिलांवर दबाव टाकला. तुम्हाला धार्मिक कार्यक्रम करुन द्यायचे आहेत की नाही, असे त्याने विचारले. या प्रकारानंतर सरपंचाने मुद्दाम पिठाच्या तीन गिरण्या आमच्या घराच्या बाजूला सुरु केल्या. या सततच्या आवाजाने मला गंभीर प्रकारचा मायग्रेन झाला. मला पाठदुखीची समस्याही जडली, असा आरोप ज्ञानेश्वरी अंजान यांनी केला आहे.

## आशा वर्करकडूनच तीन महिन्यांच्या गर्भवती महिलेला जबर मारहाण

अमरावती । प्रतिनिधी

घर बांधकामाच्या किरकोळ वादावरून आशा वर्करनेच एका तीन महिन्यांच्या गर्भवती महिलेच्या पोटावरव तसेच गुप्तांगावर जबर मारहाण केल्याची घटना घडली आहे. या मारहाणीत गर्भवती महिलेचे दातही पाडले असल्याचे पुढे आले आहे. अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा तालुक्यातील डोमा येथील ही घटना असून या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली असून अधिक तपास सध्या पोलीस करत आहे.

पुढे आलेल्या माहितीनुसार, गर्भवती महिलेसह तिच्या पतीलाही लाकडी काठीने जोरदार मारहाण करण्यात आली आहे. त्यात तिचा पती देखील गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. त्या गर्भवती महिलेवर आणि तिच्या जखमी पतीवर चूरणी येथील ग्रामीण रुग्णालयात सध्या उपचार सुरू आहे. या प्रकरणी चिखलदरा पोलिसात तक्रार दाखल झाल्यानंतर चिखलदरा पोलिसांनी मारहाण करणाऱ्या आशा वर्कर आणि तिच्या पतीला ताब्यात घेतले आहे. मात्र गर्भवती महिलांची काळजी घेण्यासाठी नियुक्त असलेल्या आशा वर्करकडूनच गर्भवती महिलांना अशा प्रकारची मारहाण होत असेल तर मेळघाट्यातील आदिवासी महिलांनी कोणावर विश्वास ठेवायचा? असा प्रश्न या निमित्याने उपस्थित केला जात आहे. जळगाव स्थानिक गुन्हे शाखेतील (एलसीबी) पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय पोटे यांचे एमडी ड्रग्ज प्रकरणातील फरार संशयिताशी तब्बल ३५२ वेळा मोबाईलवर संवाद झाल्याचे पोलिस तपासात समोर आल्यानंतर पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे.

## सांगली येथे कॉँग्रेस पक्षाच्या आढावा बैठकीत सह प्रभारी पाटील यांनी केले मार्गदर्शन



बीड । प्रतिनिधी

सांगली जिल्ह्यात दुसऱ्या दिवशी मिरज, तासगाव, कवठे महाकाळ, जत या तालुक्यात कॉँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठीआयोजित तालुकास्तरीय आढावा बैठकीस उपस्थित मान्यवर सांगली जिल्हा सह प्रभारी श्री.आदित्य दादा पाटील व प्रभारी माजी आमदार राम हरी रुपनवर, सांगली जिल्हा अध्यक्ष माजी आमदार विक्रम दादा सावंतयांनी कार्यकर्त्यांशी सुसंवाद साधत आगामी निवडणुकांची रणनीती, संघटनात्मक एकजूट आणि पक्षाच्या पुढील वाटचालीबाबत सखोल चर्चा केली. मागील निवडणुकांतील अनुभव लक्षात घेऊन सांगली जिल्ह्यातील कॉँग्रेस पक्षाला नव्या उत्साहाने आणि ताकदीने पुन्हा उभारण्याचा निर्धार या बैठकीत उपस्थित सर्व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. गावपातळीवर कॉँग्रेस पक्षाचा प्रभाव अधिक प्रभावीपणे प्रस्थापित करण्यासाठी, कार्यकर्त्यांमध्ये संघटनात्मक एकजूट आणि जनसंपर्क अधिक मजबूत करण्याचा निर्धार केला. सांगली जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्ष, पदाधिकारी, ज्येष्ठ नेते तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि सर्वांनी संघटने च्या बळकटीसाठी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा असे आवाहन अदित्य दादा पाटील यांनी केले आहे.

# नि:स्वार्थी अजातशत्रू अवलियाची पुण्यतिथी

हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी नाव असलेला निस्वार्थी, अजातशत्रू, अवलिया माणूस वयाच्या अवघ्या ५४ व्या वर्षी प्रथमच आलेल्या हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने आपल्यातून निघून गेलेल्या घटनेला रविवार दिनांक २० एप्रिल २०२५ रोजी पूर्ण चार वर्षे होत आहेत. चार वर्षांपूर्वी नियतीने आकस्मिकपणे या साध्या, सरळ, सोज्वळ, भावनिक आणि माणुसकी जपणाऱ्या अवलिया माणसाला आपल्यातून हिरावून नेले होते. हा माणूस समज आल्यापासून सातत्याने समाजाविषयी असलेल्या पोटतिडकीने समाजाचे प्रश्न मांडण्यासाठी नेहमी पुढाकार घ्यायचा परंतु पाठीमागे कुणाची दानत नव्हती आणि कुटुंबात ही एकटा पुरुष व कफल्लकता पाचवीला पुजलेली असल्याने अनेक कार्यकर्ते या माणसाकडे आले आणि गेले परंतु कुणीही टिकून राहिले नाही. म्हणून हा माणूस राजकारण आणि समाजकारणात एकटाच मुशाफिरी करत राहिला. मृत्यूपूर्वी काही वर्ष एआयएमआयएम पक्षाने या माणसातील वक्त्याला बऱ्यापैकी मंच उपलब्ध करून दिला होता. मान-सन्मान दिला एवढाच काय तो अपवाद. नाहीतर वयाचे अर्धशतक पार करेपर्यंत आर्थिक कफल्लकतेमुळे या माणसाच्या नशिबी दुर्लक्षित जिणेच आले.

अशा या अवलिया माणसाच्या संपर्कात मी सन २०१६ साली प्रथमच आलो होतो. रेड्डी साहेब माझ्यापेक्षा पाच वर्षांनी मोठे असल्याने मला माझ्या मोठ्या भावासारखे झाले. म्हणून मी आदराने नेहमी त्यांना रेड्डी साहब याच नावाने संबोधायचो. तसे मी माझ्या लहानपणापासून त्यांना ओळखायचो मात्र त्या अगोदर कधी आमचे बोलणे झाले नव्हते. मी २०14 सालापासून वृत्तपत्रांमध्ये मुक्तपत्रकार म्हणून बातम्या आणि लेख लिहिण्यास सुरुवात केली, तेव्हापासून वृत्तपत्रात प्रकाशित होत असलेल्या माझ्या बातम्या व लेख रेड्डी साहेबांनी आवर्जून वाचले. आणि २०१६ च्या जानेवारी महिन्यामध्ये असाच एक दिवस बशीरगंज चौकात असलेल्या माजी नगरसेवक जमीलभाई यांच्या पान दुकानावर माझा लेख प्रकाशित झालेले दैनिक लोकदिशा हे वृत्तपत्र घेण्यासाठी गेलो असता तिथे रेड्डी साहेब माझ्याजवळ आले होते आणि त्यांच्या स्वभावानुसार प्रथम स्वतःची ओळख करून दिली. मी त्यांना म्हटले, मी आपल्याला लहानपणापासून ओळखतो परंतु आपले कधी बोलणे झाले नाही. यावर त्यांनी सांगितले की, मी तुमच्या आजोबा पासून सर्वांना ओळखतो तुम्ही लिहिलेल्या बातम्या व लेख ही वाचतो. चांगलं लिखाण करता. दरवर्षीप्रमाणे यावर्षी ही मी चंपावतीरत्न पुरस्काराचे वितरण करणार आहे. त्यात यावेळी आदर्श पत्रकारिता पुरस्कारासाठी तुमची निवड केली आहे. हे ऐकून मला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण त्यांनी इतर पुरस्कारदात्यांसारखे माझ्याकडून ना प्रस्ताव मागितले, ना अर्ज मागितला. शिवाय मी कुठल्याही वृत्तपत्राशी जोडला गेलेलो नसतानाही फक्त माझ्या लिखाणाची नोंद घेत त्यांनी माझी चंपावतीरत्न पुरस्कारासाठी निवड करून २०१६ च्या मार्च महिन्यात हॉटेल नीलकमल येथे पुरस्कार वितरण समारंभामध्ये मला पुरस्कार देऊन सन्मानित केले. तेव्हापासून त्यांचे व माझे ऋणानुबंध जुळले ते त्यांच्या जग सोडेपर्यंत कायम राहिले.



रेड्डी साहेब राजकारण आणि समाजकारण अशा दोन्ही मध्ये नेहमी सततपणे सक्रिय राहायचे. जनहितास्तव कोणतेही आंदोलन असो, कोणत्याही पक्षाचे असो, जनतेच्या भल्यासाठी असेल तर ते सर्वात अगोदर त्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी जातीने हजर राहायचे. जनहितासाठी ते कधीही पक्षीय राजकारणात अडकले नाही. 'जिथे जनहित तिथे हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी उपस्थित', असा त्यांचा होरा असायचा.

परळी-बीड-अहेमदनगर या रेल्वे लाईन साठी सुद्धा त्यांच्या हयातीत जेवढी आंदोलने झाली, त्या सर्व आंदोलनांमध्ये त्यांनी हिरिरीने सक्रिय सहभाग नोंदविला होता. आज आपल्या बीड शहरात रेल्वे स्थानक झाले आहे. रेल्वेची चाचणी होऊन रेल्वे येऊन गेली आहे. पुढील काही वर्षात बीड ते परळी रेल्वे लाईन सुद्धा जोडली जाणार आहे. एकदाची परळी-बीड-अहेमदनगर ही रेल्वे लाईन पूर्ण झाली की मग नियमितपणे या रेल्वे लाईन वर रेल्वे वाहतूक सुरू होणार आहे परंतु हे सर्व पाहण्यासाठी आता प्रत्येक रेल्वेच्या आंदोलनात सहभाग नोंदविणारे हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी आपल्यात नाहीत याचे दुःख वाटते.

हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी यांनी अत्यंत अल्पसंख्य असलेल्या ख्रिश्चन समाजासाठी, समाजाच्या उद्धारासाठी मदर टेरेसा आर्थिक विकास महामंडळ निर्माण करून द्यावे, याकरिता बीड ते मुंबई मंत्रालयापर्यंत पायी मोर्चा सुद्धा काढला होता.

त्यांच्यातील कसलेल्या वक्त्याला खऱ्या अर्थाने प्रकाश झोतात आणलेल्या एआयएमआयएम पक्षाने सुद्धा आपल्या या दिवंगत प्रवक्त्याला समाजात कायम अमरत्व प्रदान करण्यासाठी दरवर्षी दिनांक २० एप्रिल रोजी त्यांच्या पुण्यतिथी निमित्ताने त्यांच्या नावाने काहीतरी भरीव असे कार्य सुरू करावे. जीवन जगताना आपण पाहतो की, राजकारणातील आर्थिक दृष्ट्या अनेक मातब्बर आणि गब्बर लोकांचे निधन होते तेव्हा संबंधित पक्ष त्यांच्या जयंती किंवा पुण्यतिथी निमित्ताने दरवर्षी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करतात. रेड्डी साहेब आर्थिक दृष्ट्या कधीही मातब्बर किंवा गब्बर झाले नव्हते. मात्र त्यांची वैचारिक पातळी आणि त्यांचे भले मन खूप मोठे होते. ते विचाराने आणि मनाने अत्यंत श्रीमंत होते. अशा या सुहृदयी व्यक्तिमत्त्वाच्या पुण्यतिथी निमित्ताने एआयएमआयएम पक्षाने हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी यांच्या नावाने ठळक असे काहीतरी चांगले कार्य सुरू करावे. समाजाला त्यांचा विसर पडू देऊ नये. नाहीतर आपल्याकडे एक रीत आहेच, जी सडक या हिंदी चित्रपटात गाण्याच्या ओळीत अधोरेखित केली होती. त्याचा उल्लेख येथे करू इच्छितो ये कैसा मुल्क है, ये कैसी रीत है. याद करते है हमें, लोग क्यूँ मरने के बाद.

हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी सारखा निस्वार्थी अजातशत्रू अवलिया आपल्यातून दिनांक २० एप्रिल २०२१ रोजी रात्री ०९.०० वा. दरम्यान जग सोडून गेला होता. रविवार दिनांक २० एप्रिल २०२५ रोजी त्यांची चौथी पुण्यतिथी आहे. त्यानिमित्ताने रेड्डी साहेबांना या लेखाद्वारे शब्दरूपी श्रद्धांजली अर्पण करतो.

**लेखन - एस.एम.युसूफ़ (मुक्तपत्रकार)**
**आसेफ़नगर, बीड**
**संपर्क - ९०२१ ०२ ३१२१**

# बीड जिल्ह्यातील १६७ प्रकल्पात केवळ २४ टक्के उपयुक्त पाणीसाठा; ४६ प्रकल्प जोत्याखाली तर १२ प्रकल्प कोरडेठाक

## तलावातुन बेसुमार पाणी उपसा सुरूच; जिल्हा प्रशासन कागदी घोडे नाचविण्यातच समाधानी भिषण पाणीटंचाईचा सामना करावा लागणार

बीड । प्रतिनिधी

उन्हाचा पारा वाढत असल्याने पाण्याचा वापर आणि बाष्पीभवनाचा वेग आधिकच वाढला आहे. परीणामी तलावातील पाणी दिवसेंदिवस कमी होत आहे. जिल्ह्यातील १६७ प्रकल्पांमध्ये सध्या १८३ दलघमी (२३.८८ टक्के) एवढाच उपयुक्त पाणीसाठा आहे. आता १४५ प्रकल्पातील पाणीसाठा निम्म्यापेक्षा कमी आहे. ४५ प्रकल्पातील पाणी जोत्याखाली गेले आहे.१२ प्रकल्प कोरडे ठाक पडले आहेत. जिल्ह्याची पावसाची वार्षिक सरासरी ५३६ मिलीमिटर आहे. गतवर्षी तब्बल ८३७ मिलीमीटर एवढ्या पावसाची नोंद झाली होती त्यामुळे सगळे प्रकल्प ओसंडून वाहत होते. परंतु आता प्रकल्पातील पाणी कमी होण्यासह शेतातील विहीरी, सार्वजनिक पाणी योजनेच्या विहिरी, विंधन विहिरी कोरड्या पडत चालल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात पाणी टंचाईच्या झळांचा सामना करावा लागणार आहे.

याचवेळी जिल्हा प्रशासनाने ३१ मार्च रोजी आयुक्तांना संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी ५८ कोटी १९ लाख ४९ हजार रुपये निधीची आवश्यकता असल्याचे कळवले असुन तसे नियोजन सुरू आहे मात्र संभाव्य पाणी टंचाई




अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांनी अनाधिकृत पाणी उपसा बंद ठेवण्याबाबत तहसीलदारांना दिलेल्या सुचना कागदावरच राहिल्या असुन तालावातुन पाण्याचा बेसुमार उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले असुन कागदी घोडे नाचवण्यात जिल्हा व तहसिल प्रशासन समाधान मानत असुन संभाव्य पाणीटंचाई रोखण्यासाठी वास्तविक तहसीलदार यांनी नेमलेल्या पाटबंधारे विभाग, तहसील विभाग, महावितरण विभाग आणि गटविकास अधिकारी कार्यालयातील अधिकारी यांच्या संयुक्त पथकाने अवैध पाणी उपश्यावर प्रतिबंध घालावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

### शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांचे तहसील प्रशासनाला निर्देश मात्र तहसील प्रशासन गाढ झोपेत

उन्हाळ्यामुळे पाटबंधारे प्रकल्पातील पाणी साठा झपाट्याने कमी होत आहे. जिल्ह्याचा अवर्षण प्रवण ईतिहास पाहता दुर्दैवाने पर्जन्यमानाने ओढ दिल्यास पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या ठिकाणची विद्युत मोटारी व अन्य साधनांद्वारे करण्यात येणारा पाणी उपसा रोखण्यासाठी प्रशासनाने संबंधित पाटबंधारे विभागाचे अधिकारी, कर्मचारी, तहसील कार्यालयाचे कर्मचारी, गटविकास अधिकारी कार्यालयातील कर्मचारी व महावितरण विभागाचे अधिकारी यांची संयुक्त पथके सर्व तहसीलदार यांनी स्थापित करून अवैध पाणी उपश्यावर प्रतिबंध घालण्यात यावा व तसा अहवाल कार्यालयास सादर करण्यात यावा अशा सुचना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिल्या आहेत. मात्र तहसील प्रशासन गाढ झोपेत असल्याचे दिसून येत आहे.

### जिल्हा प्रशासनाचे नियोजन ५९ कोटींचा संभाव्य पाणीटंचाई आराखडा फक्त कागदावरच

जिल्ह्यात चांगले पर्जन्यमान झाल्याने ८ एप्रिल पर्यंत एकही टँकर सुरू नाही. गतवर्षी एप्रिल मध्ये १५० तर मे आणि जून मध्ये हा आकडा ४६७ वर गेला होता. जिल्हा प्रशासनाने ३१ मार्च रोजी विभागीय आयुक्तांना संभाव्य पाणी टंचाई गावे निश्चित करून कृती आराखडा पाठवला आहे. त्यामध्ये २४५२ गावांसह १६७६ वाड्यांसाठी योजना राबविण्यासाठी संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी ५८ कोटी ९४ लाख ४९ हजार रुपयांचा आराखडा पाठवला आहे. जुन जुलै पर्यंत पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे विहिर अधिग्रहण, बोअर अधिग्रहण, टँकर सुरू करणे, तात्पुरती नळ योजना, जुन्या नळयोजनांची दुरुस्ती, नविन विहीरी खोदणे, विहारीतील गाळ काढणे असा संभाव्य टंचाई आराखडा जिल्हा प्रशासनाने तयार करून आयुक्तांकडे पाठवला आहे. मात्र हा आराखडा केवळ कागदावरच राहु नये तर प्रत्यक्षात अमलात आणावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

# सायगाव तलाठी कार्यालय पाडल्याप्रकरणी चौकशी समिती काय कारवाई करणार याकडे जिल्ह्याचे लक्ष

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील सायगाव येथील तलाठी कार्यालयाची ईमारत सरपंच कैलास छबु मरके यांनी पदाचा दुरुपयोग करून बेकायदेशीरपणे संपूर्ण ईमारत पाडून शासनाचे व जनतेचे रु ९ ते १० लाख रुपयाचे नुकसान केल्याबाबतची तक्रार महेंद्र कचरू मस्के, शेहबाज अली मजाज अली, आसेम अली माहपेज अली उस्मानी, रफिक कुरेशी, फैसल मिर्झा अशफाक खतीब, हिदायत सादेक अली यांनी केली होती या तक्रारीची गंभीर दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल विभाग, पंचायत समिती च्या अधिकाऱ्यांची चौकशी समिती बुधवार दिनांक १६ रोजी सायगाव येथे आली होती.



१९९० ला बांधलेली तलाठी कार्यालयाची इमारत ग्रामपंचायत मध्ये वेणार या नावे नोंद आहे ही इमारत लोकनियुक्त सरपंच कैलास छबू मस्के यांनी कुठल्याच कार्यालयाची परवानगी न घेता ही इमारत पाडली अशी तक्रार आहे. या ठिकाणी अंगणवाडी क्र ४ ही नोव्हेंबर पर्यंत चालू होती अशी माहिती चौकशी समिती ला अंगणवाडी सेविकेने दिली आहे तसेच ग्रामसेवक ग्रामपंचायत सदस्यांनी तलाठी कार्यालय पाडण्याचा किंवा पडलेले मटेरियल बाजूला सारण्याचा कुठलाही ठराव घेतला नसल्याची माहिती चौकशी समितीला दिली आहे मात्र सरपंच कैलास मस्के हे चौकशी समिती ला उडवा उडवी ची उत्तरे देताना प्राथमिक दृष्टया दिसून आहे तब्बल ३ वेळा त्यांनी त्यांचा जबाब बदलला असून तलाठी कार्यालयाची इमारत पडली असून असलेले मटेरिअल स्वतः सरपंच कैलास मस्के यांनी बाजूला सारल्याची कबुली त्यानी चौकशी समिती ला दिली मात्र कोणतीही शासकीय इमारत पाडली अथवा पडली असेल तर प्रशासनास कळवावे लागते मात्र सरपंचाने प्रशासनास इमारत पडल्याची माहिती लपवल्याने संशयाची सुई गवगवते त्याचबरोबर लोखंडी गजाचे भंगार, दरवाजे, खिडक्या व ईतर साहित्य त्या ठिकाणी दिसून आले नाही ते सरपंचांनी विक्री केले आहेत का हाही प्रश्न पडतो मुळात शासकीय कार्यालय बेकायदेशीर विना परवानगी पाडणे अथवा इमारत पडल्यानंतर ते प्रशासनाला न कळवणे हा गंभीर गुन्हा आहे चौकशी समिती ने तब्बल पाच ते सहा तास कसून चौकशी केली असून ही समिती सरपंचांवर तसेच त्यांच्या साथीदारावर गुन्हे दाखल करून कारवाई करेल का याकडे सायगाव ग्रामस्थांचे तसेच बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# शेती विकून २० लाख दिले, शिक्षकाने जीवन संपवले

## मृतदेह ताब्यात घेण्यास कुटुंबीयांचा नकार

परभणी । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या मानवत तालुक्यातील मंगरूळ येथील श्री नरसिंह प्राथमिक शाळेच्या सचिवाकडून आर्थिक फसवणूक आणि पिळवणूक केल्याप्रकरणी ३५ वर्षीय शिक्षक सोपान पालवे यांनी चिठ्ठी लिहून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली होती. त्यानंतर, या संस्थेचे सचिव बळवंत खळीकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, २४ तासानंतर ही सोपान पालवे यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा मृतदेह ताब्यात घेतला नाही. जोपर्यंत या संस्थेचे अध्यक्ष धोंडीराम चव्हाण तसेच मुख्याध्यापक आणि संबंधितांना अटक होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याचा निर्णय त्यांच्या कुटुंबियांकडून घेण्यात आला आहे. तसेच, पीडित कुटुंबीयांनी पोलीस स्टेशनला जाऊन आपली फिर्यादही दिली आहे.



दि.१७/४/२०२५ वार गुरुवार रोजी स्व.सौ. सुरेखाताई रविंद्र क्षीरसागर यांच्या तृतिय पुण्यस्मरणानिमित्त प्रा.आ. केंद्र राजुरी नवगण येथे आरोग्य पथक आरोग्य सेवक नितीन महुवाले, आरोग्य सेविका श्रीमती राधाताई जाधव, कुलदिप घोडके, रामचंद्र बहीर, तुकाराम बहीर आदी.

# ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस साजरे करून पाणपोईचे लोकार्पण

केज । प्रतिनिधी

पापा देशमुख यांच्या अध्यक्षते खाली एकत्र येऊन, प्रकाश भन्साळी यांच्या व्यवस्थापनासह केज येथील हॉटेल गुरुमुख बीड रोड येथे दि.१७/०४/२०२४ रोजी संध्याकाळी ०७: ०० वाजता हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ज्येष्ठ नागरिकांच्या माध्यमांतून केज शहरात अनेक कार्यक्रम राबवले जातात. वेगाने चालणे,



मोठ्याने हसणे, तसेच पाणपोईचे लोकार्पण यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमाचे निमीत्त साधुन प्रकाश भन्साळी, अशोक भिडेकर, तात्याराम मुळे, लक्ष्मीकांत देव या चार ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस साजरे करण्यात आला.

येणाऱ्या काळामध्ये शाळकरी मुलांचा सत्कार, ज्येष्ठ नागरिकांचे वाढदिवस, मार्गदर्शन पर चर्चा सत्रे, तसेच ग्रामीण क्षेत्रातील जेष्ठ नागरिकांपर्यंत पोहचून त्यांच्याशी एकरूप होण्याचा प्रयत्न केला जाईल असे यावेळी बोलतांना पापा देशमुख व भोसले सर यांनी सांगीतले. या कार्यक्रमासाठी हरूण इनामदार, केज पांचायात समितीच्या अध्यक्षा सीताताई बनसोड, तसेच केज शहरातील अनेक ज्येष्ठ नागरीक आवर्जून उपस्थित होते. अल्पाहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सचिव शरद गदळे यांच्या वाढदिवसानिमित्ताने श्याम गदळे महाविद्यालयाने राबवली स्वच्छता मोहीम

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील दहिफळ माऊली या गावचं युवा नेतृत्व आणि वडमाऊली विद्या प्रसारक मंडळ या शिक्षण संस्थेचे सचिव यांचा वाढदिवस यंदा विविध सामाजिक उपक्रमाने साजरा केला जात आहे. त्यापैकीच श्याम गदळे कला विज्ञान ज्याची स्थापना योग पुरुष शामराव गदळे गुरुजी यांनी केली, अशा या केज तालुक्यात नामांकित असणाऱ्या महाविद्यालयाने सचिव शरद गदळे यांच्या वाढदिवसानिमित्ताने स्वच्छता मोहीम राबवली.



याविषयी सविस्तर माहिती अशी की सचिव शरद शामराव गदळे हे शैक्षणिक विकास करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात शिक्षणाबरोबर ऊसतोड कामगार जे की सहा महिने आपलं घरदार सोडून राज्य आणि राज्याच्या बाहेर जातात अशा गोरगरीब लोकांसाठी ते धावून जातात व त्यांना मदत करतात. गावातील व परिसरातील सर्व लोकांच्या साठी सतत धडपडत असतात त्यांच्यावर बालपणापासूनच शामराव गदळे गुरुजी व बाळू ताई गदळे यांचे संस्कार पडलेले आहेत अशा या क्रियाशील आणि कृतिशील युवक नेतृत्वाच्या वाढदिवसानिमित्ताने श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी परिसरातील सर्व रस्ते स्वच्छ साफ करून स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. प्रत्येकाने आपलं घर आपला परिसर आणि आरोग्याची स्वच्छता ही राखली पाहिजे हे विद्यार्थ्यांनी या स्वच्छता मोहिमेच्या माध्यमातून सांगितले स्वच्छता मोहीम यशस्वी करण्यासाठी श्याम विद्यालय, श्याम कनिष्ठ महाविद्यालय व श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले अशी माहिती मा. सरपंच प्राध्यापक तात्यासाहेब डोईफोडे यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिली आहे.

# तरुणांनी व्यसनापासून दूर राहून सुदृढ समाज निर्माण करावा

## ह.भ.प. सोपान महाराज कनेरकर यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

अलीकडच्या काळात तरुणाई मोठ्या प्रमाणात व्यसनाच्या आधीन जात आहे. त्यामुळे घरदार उजाडत आहेत, संसार उध्वस्त होत आहेत, त्यामुळे तरुणांनी व्यसनापासून दूर राहून सुदृढ समाज निर्मितीसाठी प्रयत्न करावेत असे मत ह.भ.प.सोपान महाराज कनेरकर यांनी व्यक्त केले. नवगण राजुरी येथे स्व.सुरेखाताई क्षीरसागर यांच्या तृतीय पुण्यस्मरणा निमित्त आयोजित कीर्तन महोत्सवानिमित्त पहिले पुष्प अर्पण करताना ह.भ.प.कनेरकर महाराज यांनी आजच्या तरुणाईवर विशेष लक्ष द्यावे



लागेल असे म्हटले.

भगवत भक्ती ही जातीच्या पलीकडे आहे देवाच्या दरबारात जातीच्या भिंती गळून पडतात. सोशल मीडिया च्या युगात तरुणाईला मोबाईलचे व्यसन लागले आहे. दारू, गुटखा, सिगारेट हे कमी होते म्हणून आता मोबाईलचे व्यसन लागले आहे. या व्यसनापासून दूर करण्यासाठी धर्माचा मार्ग अवलंबावा लागेल असे आवाहन ह.भ.प.कनेरकर महाराज यांनी केले. या कीर्तन महोत्सवाचे उदघाटन जेष्ठ उद्योजक नितीन कोटेचा यांच्या हस्ते करण्यात आले. पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवाला भाविकांनी मोठ्या संख्येने हजर राहावे असे आवाहन हेमंत क्षीरसागर यांनी केले आहे.

# गोदावरी पात्रातील बॅरेजचे उन्हाळ्यात पुर्नभरण करण्यासाठी धोरणात्मक निर्णय करा


## आ. विजयसिंह पंडित यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन केली मागणी

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

दरवर्षी मार्च अखेर गोदावरी नदीपात्रातील सर्व बॅरेजचे पुर्नभरण करण्याचा धोरणात्मक निर्णय करावा, पैठण उजव्या कालव्यातून उन्हाळी हंगामासाठी पाण्याचे एक आवर्तन वाढवावे, शहागड को. प. बंधाऱ्याची उंची वाढवून त्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करावे, पिण्याच्या पाण्यासाठी गोदावरी नदीपात्रात तात्काळ पाणी सोडावे यांसह विविध मागण्यांच्या अनुषंगाने आ. विजयसिंह पंडित यांनी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार यांच्यासह जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी आ. विलास भुमरे, माजी आ. अमरसिंह पंडित यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

जायकवाडी धरणाच्या पैठण उजवा कालवा आणि बॅरेजच्या अनुषंगाने सार्वजनिक महत्वाच्या विषयांच्या अनुषंगाने आ. विजयसिंह पंडित यांनी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार यांच्यासह जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी पैठणचे आमदार विलास भुमरे पाटील, जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी बैठकीला उपस्थित होते. यावेळी पैठण उजव्या कालव्यातून उन्हाळी हंगामासाठी पाण्याचे नियोजन यासह इतर महत्वाच्या बाबींवर चर्चा झाली.

या भेटी संदर्भात माहिती देताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, जायकवाडी धरणातील पाणी




वापराचे नियोजन करताना भविष्यात परिस्थितीनुरूप काही बदल करावे लागतील, गोदावरी नदी पात्रातील सर्व बॅरेजचे पुर्नभरण करण्यासाठी लागणाऱ्या पाण्याचे मोजमाप करून मार्च अखेरीस त्याचे पुर्नभरण करण्याकरीता आवश्यक पाण्याचे नियोजन करून दरवर्षी मार्च अखेरीस बॅरेजचे पुर्नभरण करण्याचा धोरणात्मक निर्णय करावा लागणार आहे. शहागड को.प.बंधारा नादुरुस्त असल्यामुळे त्याच्यावर पिण्याच्या पाण्याचे अवलंबत्व लक्षात घेऊन या बंधाऱ्याची उंची वाढवून त्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याच्या अनुषंगाने यावेळी चर्चा झाली. पैठण उजव्या कालव्यातून उन्हाळी हंगामासाठी पाण्याची पाळी वाढवावी, दोन पाणी पाळीमधील अंतर कमी करून ते पंधरा दिवसांचे करावे, दि.२० एप्रिल पासून पुढची पाणी पाळी सुरु करावी यासह विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाल्याचे आ. पंडित यांनी सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, पैठण उजव्या कालव्याची वहनक्षमता पुर्नस्थापित करण्यासाठी कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम झाल्यामुळे कालव्यातून पाण्याचा पाझर होत नाही, परिणामी परिसरातील जलस्त्रोत कोरडे पडले आहेत. त्यामुळे गोदावरी काठच्या टंचाईग्रस्त नागरीकांना आणि जनावरांना पिण्यासाठी नदीपात्रात पाणी सोडावे लागणार आहे. या अनुषंगाने सुध्दा या बैठकीत चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले. गोविंदवाडी साठवण तलावाची दुरुस्ती, उजव्या कालव्यावरील पुलांची कामे, आपत्कालीन परिस्थितीत कालव्यातून नदीपात्रात पाणी सोडण्यासाठी काट नियामकाची बांधकामे यांसह विविध विषयांवर यावेळी सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी दिली, पुढच्या आठवड्यात राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेणार असल्याची माहिती सुध्दा यानिमित्ताने दिली.

# भाजप नेते किरीट सोमैय्यांच्या ठिय्यानंतर परळीचे महसूल प्रशासन खडबडून जागे

## १४ जणांविरुद्ध शासनाची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल

परळी वैजनाथ, प्रतिनिधी

परळी येथे जन्मदाखले देण्यात प्रचंड बोगसगिरी झाल्याचा आरोप करत परळीच्या तहसीलदार, नायब तहसीलदारांसह संबंधित सर्वांवर गुन्हे दाखल करा. या मागणीसाठी तीन तास परळी पोलीस ठाण्यात ठिय्या मांडून बसलेल्या भाजप नेते किरीट सोमैय्या यांच्या पाठपुराव्यानंतर आता परळीतील महसूल प्रशासन खडबडून जागे झाले असुन महसूल अधिकाऱ्यांनी चौदा जणांविरुद्ध चुकीचे दस्तऐवज सादर करून शासनाची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलिस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, जन्म व मत्यु प्रमाणपत्र मिळणेसाठी परळी येथे रहिवासीचा / मृत्यु बाबतचा कोणताही ठोस पुरावा सादर न करता परळी व सिरसाळा बाहेरील खोटे कागदपत्रे तहसील कार्यालय परळी वैजनाथ येथे सादर करुन शासनाची फसवणूक केली. परळीचे जन्म व परळी येथे मृत्यु झाले बाबत प्रमाणपत्र हस्तगत करुन शासनाची फसवणूक केली म्हणुन महसूल प्रशासनाने गुन्हा दाखल केला आहे.तहसील कार्यालयातील सहाय्यक महसुल अधिकारी व्यंकट जयराम सुर्यवाड यांनी याबाबतची फिर्याद दाखल केली असुन या फिर्यादीवरून १) श्री. सुमित विजयकुमार झंवर रा. परळी २) वैखेमुंनबी इसामशहा सय्यद, रा. परळी ३) सुनिल मारोती६) शेख गफ्फार सत्तार रा. परळी ७) शाहीनबेगम युसुफ बक- यावाले रा. परळी ८) राजीव प्रकाश फड रा. परळी ९)कांबळे रा. सिरसाळा ४. शेख गुलाम हबीब गुलाम मुस्तफा रा. सिरसाळा ५) महीबीशबेगम सिध्दीक आली शेख रा. परळी फेरोजखा इसाकखा पठाण रा. सिरसाळा १०) शेख अजहर शेख वहीदोद्दीन रा. सिरसाळा ११) नितीन राजाभाऊ पौळ रा. सिरसाळा १२) अलीम अब्दुल सय्यद रा. परळी १३) शेख फारुख खमरोद्दीन रा. परळी १४) मो. अबदुस समंदखान खालेद पि. मो. अब्दुल रहेमान खान रा. सिरसाळा या चौदा नागरिकांवर गुरनं. ८२/२०२५ कलम ४२०, ४६८, ४७१ भादवी सहकलम २४ द्धश ठ्शसळी–ीीरींळेप`ष इळीींही रपव उ्रशरींही –ळीं १९६९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास परळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ हे करीत आहेत.

परळीचे तहसीलदार तक्रारीसाठी पुढे आल्याचा दिला होता. किरिट सोमैय्या यांनी संदर्भ दरम्यान, किरीट सोमय्या दिनांक १५ रोजी परळी वैजनाथ येथे आले होते. यावेळी बोलताना त्यांनी मी हे प्रकरण उचलल्यानंतर व पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची मागणी केल्यानंतर परळीचे तहसीलदार तक्रार देण्यास पुढे आल्याचे म्हटले होते. मात्र त्यांनी तक्रार दिली तरीही महसूल प्रशासनातील अधिकारी कर्मचारी हे दोषी नाहीत असे होत नाही. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. तहसीलदार, नायब तहसीलदार व संबंधित सर्वांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे अशी मागणी त्यांनी त्यावेळी केली होती.

# अंबाजोगाईमध्ये गुटखा वाहतुक करणारी ओमीनी कार पकडली

### बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

गेवराई । प्रतिनिधी

अंबाजोगाई उपविभाग मध्ये चालणारे अवैध धंद्यांची गोपनिय माहीती काढुन कडक कारवाई करण्याचे आदेश वरीष्ठांनी दिले होते. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेला गोपनिय बातमीदारामार्फतीने माहीती मिळाली की अंबाजोगाई येथुन चनई रोडने एक पांढऱ्या रंगाचे ओमीनी चार चाकी कार मध्ये गुटखा विक्री साठी वाहतुक केली जात आहे अशी माहीती मिळालेवरुन मौजे डोंगरपिंपळा येथे हनुमान मंदीराचे समोर स्थानिक गुन्हे शाखेने सापळा लावुन थांबले असता समोरुन येणाऱ्या कारला हाथ करुन थांबवले असता कार जागीच थांबवुन गुटखा वाहतुक करणारा ईसम अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला त्याची माहीती घेतली असता त्याचे नांव कृष्णा मुकुंद भालेकर रा. स्वातंत्र सैनिक कॉलणी, मोरेवाडी ता



अंबजोगाई असे होते त्याचे ताब्यातुन शासनाने प्रतिबंधीत केलेला सुगंधीत पान मसाला गुटखा व एक चार चाकी ओमीनी कार असा एकुण १,१५,०६६ रु मुद्देमाल जप्त करुन आरोपी विरुध्द पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर गु.र.नं ११६/२०२५ अन्वये पोलीस हवालदार विकास राठोड यांचे फिर्यादीवरुन गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पळुन गेलेला कृष्णा मुकुंद भालेकर याचा शोध पोलीस घेत आहेत.

सदरील कारवाई हि श्री नवनीत कॉवत, पोलीस अधीक्षक,बीड, श्री चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई, श्री उस्मान शेख, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, महेश जोगदंड, राजु पठाण, नितीन वडमारे, विकी सुरवसे यांनी केली आहे.

# आ.सुरेश धस यांच्याकडून बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबाची सांत्वनपर भेट

## कुटुंबाला आधार देत दोन लाखांची केली आर्थिक मदत

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगांव येथे भरदिवसा खून झालेल्या घटनेतील मृत व्यक्ती बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबीयांची त्यांच्या राहत्या घरी कि.आडगाव येथे आष्टी तालुक्याचे विद्यमान आमदार सुरेश धस यांनी भेट घेऊन सांत्वन केले व त्यांच्या कुटुंबीयांना आधार देत दोन लाखांची आर्थिक मदत जाहीर केली.

संपूर्ण महाराष्ट्राला हादरून टाकणारी घटना बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे घडली यामध्ये भाजप कार्यकर्ते बाबासाहेब आगे या व्यक्तीची भर दिवसा सत्तूराणे सपासप वार करत क्रूरपणे हत्या करण्यात आली. या प्रकरणातील आरोपी नारायण फपाळ हा स्वतः पोलिसांना शरण आला व त्याला कोर्टामध्ये हजर केल्यानंतर चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आलेली आहे. ही हत्या कोणत्या कारणाने झालेली आहे हे अजून अस्पष्ट असून यामध्ये अनेक तर्कवितर्क लावण्यात येत आहेत.



यामध्ये खरे काय आहे ते पोलीस तपासात उघड होईल त्यामुळे सध्या तरी बाबासाहेब आगे यांची मृत्यू नंतर बदनामी करू नये असे सांगण्यात येत आहे.

सदरील व्यक्तीची भरदिवसा सपासप वार करून करण्यात हत्या आली त्यामुळे कुटुंब भयभीत झालेले आहे. कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कुटुंबातील कमावता व्यक्ती गेल्यामुळे कुटुंब संकटात सापडले आहे कुटुंबाला आधाराची गरज आहे हे पाहता आमदार सुरेश धस यांनी कि.आडगाव येथे येऊन त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन करून धीर दिला त्यांच्या दुःखामध्ये मी सामील असल्याचे सांगितले व त्यांच्या कुटुंबीयांना दोन लाखांची आर्थिक मदत केली.

# शॉर्टसर्किटने घरास आग लागुन संसारोपयोगी साहित्य जळुन खाक

धारूर / प्रतिनिधी

भोगलवाडी येथील एका महिलेच्या घरास मिटरमध्ये



शॉर्टसर्किट होऊन आग लागल्याने घरातील संसारोपयोगी साहित्यासह महत्त्वाचे कागदपत्रे व सोने जळुन खाक झाल्याची घटना घडली. सदरील निराधार असुन, तीला शासनाने तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी भोगलवाडीतील नागरिकांनी केली आहे.

यासंदर्भात माहिती अशी की, भोगलवाडी ता.धारूर येथील संगीता आश्रुबा तिडके या महिलेच्या घरास दुपारच्या वेळी घरातील मिटरमध्ये अचानक शॉर्टसर्किट होऊन, घरास आग लागली. या आगीत घरातील सर्व संसारोपयोगी साहित्य, धान्य, महत्त्वाचे कागदपत्रे व सोन्याचे दागिने जळुन बेचिराख झाले. विशेष म्हणजे आपदग्रस्त महिला विधवा असुन, ती एकटीच राहत असते. ती अगोदरच निराधार असुन, या अचानक घडलेल्या घटनेने त्या महिलेचा संसार उघड्यावर आला असुन, तीला आर्थिक मदतीची तात्काळ गरज आहे.

तरी शासनाने आपदग्रस्त महिला संगीता आश्रुबा तिडके यांच्या घराचा पंचनामा करून, त्यांना तात्काळ आर्थिक मदत करावी, अशी मागणी भोगलवाडी येथील नागरिकांनी केली आहे.

# बिअर बार फोडुन दारु चोरणाऱ्याला स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद!

गेवराई । प्रतिनिधी

अंबाजोगाई उपविभागातील दाखल होणाऱ्या चोऱ्या, घरफोड्याचा संमातर तपास करुन आरोपीचा शोध घेवुन गुन्हयातील गेला माल हस्तगत करणे बाबत आदेश वरीष्ठांनी दिले होते. काही दिवसापुर्वी अंबाजोगाई शहरातील रंगागुल्ली बिअर मधुन रात्रीचे वेळी बिअर बार फोडुन चोरटयांनी विदेशी दारु चोरुन नेल्याचे घटना घडली होती आज्ञत आरोपीविरुध्द पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर येथे गुन्हा दाखल झालेला होता. स्थानिक गुन्हे शाखेला गोपनिय बातमीदारामार्फतीने माहीती मिळाली की सराईत दरोडेखोर सुरेश उर्फ सुर्यकांत रामकिसन गंगणे हा सदर बाजार चौकामध्ये मोटार सायकलवर बसलेला आहे या वरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने झडप मारुन पकडले त्याचेकडे अंबाजोगाई येथे झालेल्या बिअरबार फोडल्या बाबत चौकशी केली असता त्याने सुरुवातीला उडवाउडवीचे उत्तरे दिली त्यानंतर त्यास अधिक विश्वासात



घेवुन चौकशी केली असता त्याने बिअर बार फोडुन विदेशी दारु चोरल्याचे प्राथमिक चौकशीअंती निष्पन्न झाले असुन त्यांनी व त्याचा साथीदार श्रीकृष्ण उर्फ वाघ्या दहीफळे या दोघांनी मिळुन बिअर बार फोडल्याचे कबुल केले आहे, त्याचे ताब्यातुन गुन्हयात चोरी करण्यासाठी वापरलेली मोटार सायकल व विदेशी दारु विक्री करुन त्याचे वाटेला आलेली ११००० रु असे एकुण ५० हजार रुपयाचां माल जप्त करुन आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर यांचे ताब्यात देण्यात आला आहे. सदरील आरोपी हा दारु पिण्याचे सवईचा असुन याचेवर दोन वेळा मकोका अन्वये कारवाई करण्यात आलेली होती. तो पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे.

सदरील कारवाई हि श्री नवनीत कॉवत, पोलीस अधीक्षक,बीड, श्री चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई, श्री उस्मान शेख, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, महेश जोगदंड, राजु पठाण, नितीन वडमारे, विकी सुरवसे यांनी केली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT